# उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका यांचे कार्यालय

राष्ट्रसंत अचार्य श्री. पद्मसागर सूरीश्वरजी (भवन) एम.बी.एम.सी.बिल्डींग
शांती गार्डन, रामनगर, मिरारोड (पुर्व) ४०११०७.

---

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे.
८९६३
29 SEP 2017
आवक क्रमांक ....

जा.क्र.उपनि/ठाणे ता./बी-५/चंद्रेश ॲकॉर्ड बि.नं.९ ते १३/
क.८८/ १८७७ /सन २०१७
दिनांक ७/०९/२०१७

वाचावे:- १) संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचे या कार्यालयास दिनांक १८/०७/२०१५ रोजी प्राप्त झालेले पत्र.

२) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयें दिनांक २९/०८/२०१६ रोजीचे आदेश.

३) श्री विनायक रामचंद्र साखरे, विभागीय सहनिबंधक, सह. संस्था (ले.प.) (सेवानिवृत्त) तथा चौकशी अधिकारी यांनी कलम ८३ अन्वये त्यांचेकडील दि. ०३/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास दि. ११/०१/२०१७ सादर केलेला चौकशी अहवाल.

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.

---

ज्याअर्थी, चंद्रेश ॲकॉर्ड बि.नं.९,१०,११,१२,१३ को-ऑप. हौसिंग सोसा. लि., चंद्रेश ॲकॉर्ड , सिल्वर पार्कच्या समोर, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीनुसार पंजीकृत करण्यात आलेली असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, उक्त वाचले क्र. १ अन्वयें चंद्रेश ॲकॉर्ड बि.नं.९,१०,११,१२,१३ को-ऑप. हौसिंग सोसा. लि., चंद्रेश ॲकॉर्ड , सिल्वर पार्कच्या समोर, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे या संस्थेंतील पदाधिकाऱ्यांनी या कार्यालयास प्राप्त दिनांक १८/०७/२०१५ रोजी पत्र देऊन मागिल ५ वर्षाची कमिटी दिनांक १९/०६/२००६ ते २२/०२/२०१५ मध्ये जवळ जवळ ८ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यरत होती. सदर कमिटीने सभासदांना विचारात न घेता मनमानी पध्दतीने संस्थेंचे रिपेरिंग, पेंटीग, प्लास्टर, गटर, आतील पेंटीग इत्यादीचा खर्च सन २००८ ते २०१५ या कालावधीत जवळ जवळ रुपये २४,४९,१६१/- इतका केला होता. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या जुन्या कमिटीने उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या बाबींचा अपहार केल्याचे संस्थेचे चेअरमन व सचिव यांनी केलेल्या तक्रारीनुसार सखोल चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून श्री विनायक रामचंद्र साखरे, विभागीय सहनिबंधक, सह. संस्था (ले.प.) (सेवानिवृत्त) यांची या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये संदर्भ क्र. २ दिनांक २९/०८/२०१६ रोजीचे आदेशान्वये नियुक्ती केलेली होती. आणि,

ज्याअर्थी सदर बाबत उक्त वाचावे क्र. ३ अन्वये श्री विनायक रामचंद्र साखरे, विभागीय (सेवानिवृत्त) सहनिबंधक, सह. संस्था (ले.प.) यांनी दिनांक ११/०१/२०१६ रोजी या कार्यालयास चौकशी अहवाल सादर केलेला आहे. सदर चौकशी अहवालातील मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षात संस्थेंच्या संचालकांनी विश्वस्त या नात्याने संस्थेंचे दप्तर, लेखाविषयक बाबी व तांत्रिक बाबी योग्य रितीने सांभाळणे आवश्यक होते. परंतु संचालक मंडळाने या सर्व बाबींकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे सदरचे संचालक मंडळ रु २६,८९,०३९/- या रकमेच्या कामकाजाच्या अनियमततेबद्दल जबाबदार असल्याचे त्यांच्या अहवालात नमुद केले आहे. तसेच दि. ३१/०३/२०१४ च्या ताळेबंदात बँकेची जमा व व्याजाची तफावत रु. ८,८६,२८३/- एवढया रकमेस जबाबदार आहेत. त्यामुळे संस्थेंचे संचालक व ऑडीटर/अकौट रायटर हे महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ चे नियमानुसार कारवाईस पात्र आहेत व याबाबत सखोल चौकशी होणे आवश्यक असुन कमल ८८ अन्वयें जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. आणि,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयें नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी यांनी त्यांचेकडील अहवालात सुचविल्याप्रमाणे संबंधित मुद्यांवर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत चौकशी अधिकारी नियूक्त करणे आवश्यक आहे, असे माझे मत झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, दिनेश चंदेल, उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे असा आदेश देत आहे की, चंद्रेश ॲकॉर्ड बि.नं.९,१०,११,१२,१३ को-ऑप. हौसिंग सोसा. लि., चंद्रेश ॲकॉर्ड , सिल्वर पार्कच्या समोर, मिरा-भाईदर रोड, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे या संस्थेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करण्यासाठी परिशिष्ट “अ” प्रमाणे श्री बी. आर. मगदुम, सेवा निवृत्त, सहाय्यक निबंधक यांची कलम ८८ खाली प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

त्यांनी चौकशी करुन तीन महिन्यांचे आंत चौकशी अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश माझे आज दिनांक ०६/०९/२०१७ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह देत आहे.

(दिनेश चंदेल)
उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे

ठिकाण :- मिराराड,ठाणे
दिनांक :-6 /09/२०१७